नक्षलग्रस्त भागाच्या विकासाचा विशेष कृतीकार्यक्रम सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्याकरीता निधी वितरित करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: नक्षल-२४१९/प्र.क्र. ७९/का-१४१७
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ०९ ऑगस्ट, २०१९

वाचा : १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. नविका-१००९/प्र.क्र. ६८/का-१४१५ दिनांक १७.१२.२००९ व दिनांक २७.१.२०१०

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र. ९२/अर्थ-३, दिनांक ८.७.२०१९

प्रस्तावना :

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यांकरीता समन्वय समितीला नक्षलग्रस्त भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षात रुपये ३ कोटी प्रमाणे निधी नियोजन विभागामार्फत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयास अनुलक्षून व प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया यांना प्रत्येकी रुपये ३ कोटी प्रमाणे निधी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

नक्षलग्रस्त भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील विशेषत: जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या संबंधित जिल्हा समन्वय समितीस संदर्भाधीन शासन निर्णयासोबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे सामुहिक लाभाच्या योजना / सुविधा निवडुन स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करणे शक्य होण्याकरिता चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांना सन १९१९-२० या आर्थिक वर्षाकरीता एकूण तरतूदीच्या ६० टक्के इतक्या मर्यादेत पुढील प्रमाणे निधी या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	सन १९१९-२० साठी एकूण तरतूद (रु.लक्ष)	वितरीत निधी (रु.लक्ष)
१	गडचिरोली	३००.००	१८०.००
२	गोंदिया	३००.००	१८०.००
३	चंद्रपूर	३००.००	१८०.००
४	भंडारा	३००.००	१८०.००
	एकूण	**१२००.००**	**७२०.००**

२. **नक्षलग्रस्त** भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीताउपलब्ध निधी खर्च करताना संदर्भाधीन शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन परिपत्रकातील सूचनांचे जिल्हा समितीने काटेकोरपणे पालन करावे.

३. **नक्षलग्रस्त** भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीताउपलब्ध निधी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त ठेवण्यात यावा. सदर निधी खर्च करताना त्या निधीपैकी कमीत कमी ७५% निधी नक्षलग्रस्त भागाच्या अतीदुर्गम व अतीसंवेदनशील क्षेत्रामध्ये खर्च करण्यात यावा. यासाठी संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कामाच्या निवडीसाठी परिच्छेद ६, ७, ८ व ९ मधील, अंदाजपत्रक व मंजूरीसाठी परिच्छेद १० मधील, निधी वितरणासाठी परिच्छेद १२ व १३ मधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

४. **नक्षलग्रस्त** भागातील स्थानिक पातळीवरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीताउपलब्ध निधी जिल्हाधिकारी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया यांनी खर्च करताना मागणी क्रमांक ओ-७, ३४५१ सचिवालय-आर्थिक सेवा, ०९०, सचिवालय (०१) (०१) नियोजन विभाग, (०४) (०१) नक्षलवादी भागासाठी विशेष कृती दल (योजनांतर्गत) ३१ सहायक अनुदाने वेतनेत्तर (३४५१ ०६५४) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून

भागविण्यात यावा. तसेच, या उपशिर्षाखाली होणा-या खर्चासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे नियंत्रक अधिकारी असतील व जिल्हा नियोजन अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ ठेवण्याची तसेच खर्चाची माहिती वेळोवेळी शासनाला देण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया यांची राहील.

६. **वित्त** विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. **महाराष्ट्र** शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०८०९१७००१३४२१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HEMANT DATTA BHANGLE

Digitally signed by HEMANT DATTA BHANGLE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=31cc357a98de35264e3f32a02a11a5f444ac03f702947b9db1e018f1ec6ec357, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=3e3482a3b78b132fd024af2073b3b3aa28fe67898c829b2dc628c953bb336e14, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=HEMANT DATTA BHANGLE
Date: 2019.08.09 17:05:20 +05'30'

(हेमंत भांगले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-३२
२. मा. विधान मंडळ सदस्य (सर्व)
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २,मुंबई / नागपूर
४. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ व २,मुंबई / नागपूर
५. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
७. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
८. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
१०. जिल्हा पोलीस अधिक्षक, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
११. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर

१२. उप वन संरक्षक, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
१४. जिल्हा नियोजन अधिकारी, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
१५. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली / गोंदिया / चंद्रपूर / भंडारा
१६. कार्यासन अधिकारी, (का-१४११/ १४१४/ १४२४), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१७. निवडनस्ती (का-१४१७), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२